


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ४४ * नांदेड * रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## मुंबईत मुलुंडमध्ये भीषण अपघात, मेट्रोचा स्लॅब कोसळला; एकाचा मृत्यू, चार जखमी

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईतील मुलुंड परिसरात शनिवारी दुपारी मेट्रो बांधकामादरम्यान गंभीर अपघात घडला. एलबीएस रोड एलबीएस रोडवरील बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो पिलरचा सिमेंटचा एक भाग अचानक तुटून खाली पडला. हा तुकडा रस्त्यावरून जात असलेल्या ऑटो रिक्षा आणि एका कारवर कोसळला. ही घटना जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.२० वाजता या अपघाताची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाली. या दुर्घटनेत ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. तर मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार एकाचा मृत्यू झाला आहे. महापौर रितू तावडे मुलुंड घटनास्थळी पोहोचल्या होत्या.

या घटनेत जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झालेलाल आहे, मात्र त्या मृत व्यक्तीबाबत कोणतीही इतर माहिती समोर आलेली नाही. या ठिकाणी काम सुरू असताना तेथे बॅरीकेट लावलेले नव्हते, किंवा कोणत्याही इतर उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या, वाहतूक कोंडी होते म्हणून परिसरातील बॅरीकेट हटवण्यात आले होते, त्यानंतर आज ही अपघाताची दुर्दैवी घटना घडली आहे. त्या परिसरात काम सुरू असतानाच तेथे कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या, काम सुरू असताना स्लॅब कोसळून ही घटना घडली आहे, यामध्ये चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली होती, त्यानंतर आता एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेत रामधन यादव याचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात आणण्यापूर्वीच रामधन यांचा मृत्यू झाला होता. राजकुमार इंद्रजित यादव (वय ४५), महेंद्र प्रताप यादव (वय ५२), दिपा रुहिया (वय ४०) हे तिघे जखमी आहेत.

## नरहरी झिरवळ नॉट रिचेबल असल्याच्या चर्चांना उधाण

**मुंबई (प्रतिनिधी)–** संपूर्ण राज्याच्या प्रशासनाचे केंद्र असलेल्या मंत्रालयातील कर्मचाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकडले गेल्यामुळे प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. अन्न व औषध प्रशासन खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयात हा प्रकार घडला होता. या घटनेनंतर नरहरी झिरवळ हे अज्ञातवासात गेले आहेत. गेल्या काही तासांपासून नरहरी झिरवळ हे नॉट रिचेबल असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

झिरवळ यांच्या कार्यालयातील राजेंद्र ढेरंग या कर्मचाऱ्याने एका मेडिकल दुकानदाराकडून ३५ हजारांची लाच घेतली होती. हे पैसे घेताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी (एसीबी) राजेंद्र ढेरंग यांना रंगेहाथ पकडले गेले होते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन खात्याचे मंत्री असलेल्या नरहरी झिरवळ यांची नाचक्की झाली होती.

## महाशिवरात्रीनिमित्त विष्णुपुरी काळेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

### रात्रीपासून भाविकांच्या दर्शनाची व्यवस्था



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाशिवरात्रीनिमित्त विष्णुपूरी काळेश्वर मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री अभिषेक झाल्यानंतर भाविक भक्तांना दर्शनासाठी सोडण्यात येणार असून गावात विविध ठिकाणी चहापाणी, फराळ व भाविकांच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व सामाजिक संघटना यांच्याकडून स्वागत करणारे बॅनर लावण्यात आले आहेत. ग्रामपंचायत कार्यालय कडून दिवा-बत्ती, रस्ता, स्वच्छता करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी काळेश्वर मंदिर विष्णुपूरी येथे महाशिवरात्रीनिमित्त रात्री १२ वाजता मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर व समिती पदाधिकारी यांच्या उपस्थितीत विधीवत पूजन महाअभिषेक व महाआरती झाल्यानंतर रात्रीपासून श्री काळेश्वर दर्शनसाठी भाविक भक्तांना सोडण्यात येणार आहे. महाशिवरात्रीनिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन दि. ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले असून दैनंदिन विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १६ फेब्रुवारी रोजी हभप राम महाराज सुगावकर यांच्या काल्याचे कीर्तन व महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे.

महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपुरी नांदेड येथे दि.९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारीपर्यंत हभप राजेजी महाराज, हनुमान मंदिर पुजारी, विष्णुपुरी यांच्या कृपाशिर्वादाने तसेच हभप भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याची सांगता सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी काळेश्वर मंदिर पुजारी गणेश महाराज ढणमने, हभप राम महाराज, वडेपुरीकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. या सप्ताहाचे नियोजन उद्धव नामदेवराव हंबर्डे विष्णुपूरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. हभप निवृत्तीनाथ महाराज पांगरेकर, हभप सुधीर महाराज, हभप राम महाराज सुगावकर यांचे काल्याचे किर्तन सोमवारी सकाळी ८ ते १० या वेळात होणार आहे.

ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे, उपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे यांच्यावतीने गावात महाशिवरात्रीनिमित्त साफसफाई, दिवाबत्ती, रस्ते यासह सुविधा भाविक भक्तांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जीवरक्षक दलासह अधिकारी, कर्मचारी पोलीस अंमलदार, होमगार्ड यांच्या कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन विश्वस्त समिती व समस्त गावकरी मंडळी, विष्णुपुरी यांनी केले आहे.

**गोदातीर समाचार**



**आज महाशिवरात्री**

महाशिवरात्रीनिमित्त सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा!

– मुख्य संपादक

**सुट्टीची सूचना**

आज महाशिवरात्रीनिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. १६ फेब्रुवारी २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

## मुख्यमंत्री फडणवीसांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे नांदेडमध्ये उत्साहात स्वागत





**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी विमानतळावर आगमन झाले. यानंतर मुख्यमंत्री नागपूरकडे तर उपमुख्यमंत्री वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवीकडे हेलिकॉप्टरद्वारे रवाना झाले. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

शनिवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास मुंबई येथून विमानाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे येथील श्री गुरु गोविंद सिंघजी विमानतळावर आगमन झाले. यानंतर परळी येथील कार्यक्रम आटोपून दुपारी पुन्हा नांदेडवरून नागपूरकडे रवाना झाले. तर यानंतर विमानतळावर दाखल झालेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे थेट पोहरादेवी येथील कार्यक्रमासाठी रवाना झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आ. राजेश पवार, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, नांदेड परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार तसेच महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पुनमताई पवार, संतोष मुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विमानतळावरून हेलिकॉप्टरने परळी वैजनाथ जि. बीडकडे महापशुधन एक्स्पो २०२६ या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी रवाना झाले. हा कार्यक्रम आटोपून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुपारी ३ च्या सुमारास नांदेड विमानतळावर पुन्हा दाखल झाले. यानंतर येथून ते थेट नागपूरकडे रवाना झाले. दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दुपारी ३ वाजेच्या सुमारास नांदेड विमानतळावर आगमण झाले. येथून ते थेट पोहरादेवी वाशिम येथील कार्यक्रमासाठी रवाना झाले. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, महापौर कविता मुळे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदींनी स्वागत केले.




## पोलीस भरतीसाठी बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात राहण्याची तात्पुरती व्यवस्था

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने बाहेरगावाहून नांदेड शहरात येणाऱ्या उमेदवारांची गैरसोय होऊ नये, यासाठी नांदेड जिल्हा पोलीस प्रशासनामार्फत पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी उमेदवारांना स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, तसेच मूलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत, उमेदवारांनी या सुविधेचा शिस्तबध्द पध्दतीने लाभ घ्यावा व परिसराची स्वच्छता व कायदा सुव्यवस्था राखावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड जिल्हा पोलीस प्रशासन सर्व उमेदवारांना पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीत भरती प्रक्रिया पार पाडण्याबाबत कटीबद्ध असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.




## टी २० वर्ल्डकप : आज भारतविरूद्ध पाकिस्तानमध्ये सामना

**कोलंबो (वृत्तसंस्था)–** आयसीसी पुरुष टी २० वर्ल्डकपमध्ये रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियममध्ये भारत आणि पाकिस्तान यांचा सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होणार आहे. हा यंदाच्या वर्ल्डकपमधील २७ वा साखळी सामना असेल. क्रिकेटप्रेमींचे लक्ष असलेल्या या हायव्होल्टेज सामन्याआधीच एक चिंता वाढवणारी बातमी आली आहे. टी २० वर्ल्डकपमधील भारत - पाकिस्तान सामन्यावर पावसाचे सावट घोंगावत आहे. यामुळे क्रिकेटप्रेमी चिंतेत आहेत.

श्रीलंकेच्या हवामान विभागाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यादरम्यान पावसाची शक्यता वर्तविली आहे. आग्नेय बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे कोलंबोत पावसाची ९३ टक्के शक्यता आहे. सामन्याच्या वेळेत म्हणजेच संध्याकाळी सात पासून पुढे पावसाची शक्यता फक्त नऊ टक्के आहे. पण संध्याकाळपर्यंत पावसाची शक्यता ४९ टक्के आहे. तापमान २६ ते २८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.



# मानवी जीवनातील दुःखांचा सर्वनाश करणारे देवाधिदेव महादेव

ॐ त्र्यम्बकं यजामहे
सुगन्धिं पुष्टिवर्धनम्!
उर्वारुकमिव बन्धनान
मृत्योर्मुक्षीय मामृतात्!!

महामृत्युंजय मंत्र हे अतिशय विनयपूर्वक श्रद्धा भावनेने महादेवास संबोधले जाणारे मंत्र आहे. महामृत्युंजय मंत्र हे केवळ एक मंत्र नसून महामंत्र आहे. ज्याच्या केवळ श्रवणमात्रांनी सुद्धा आपल्या सभोवताली एक सुरक्षा कवच निर्मित होते व आपले कसल्याही प्रकारचे अनिष्ट होऊ शकत नाही. महामृत्युंजय ह्या महामंत्राचा अर्थ असा आहे की - आम्ही त्रिनेत्र असलेल्या महादेवाची पूजा करतो, जे सुगंधित आणि पोषण वाढवणारे आहेत. जसे कोळंबीचे फळ त्याच्या डंठलापासून वेगळे होते तसे आम्हाला मृत्यू पासून मुक्त करून अमरत्व प्रदान करावे. अशा प्रकारचा प्रगल्भ महिमा महादेवास संबोधल्या जाणाऱ्या प्रत्येक शब्दात समाहित आहे.

महादेवाच्या बाह्य स्वरूपाबद्दल साध्या आणि सरळ शब्दात सांगायचे म्हणजे महादेव हे अतिशय प्रेमळ, दयामय, वैराग्य, धारण कृपासागर व साक्षात ज्ञानाची मूर्ती आहेत. महादेव हे खरं पाहिल्यास एक नवजीवन दाता आहेत. इतर देवांपेक्षा महादेवास प्रसन्न करणे अगदी साधे, सरळ व सोपे आहे. महादेवास त्यांच्या भक्ताने विश्वास व भक्ती भावनेने एक संपूर्ण पाण्याने भरलेल्या पात्राने पाणी अर्पित करून देखील महादेव सहज प्रसन्न होतात. महादेव हे लवकरात लवकर त्यांच्या भक्तांना त्यांच्या तपश्चर्येचे फळ देत असतात. महादेवाने यमाच्या ताब्यात गेलेल्या बालस्वरूप मार्कंडेयाला चिरंजीवी केले होते. लंकाधिपती रावणास देखील त्याने केलेल्या प्रार्थनेने प्रसन्न झाले होते.

महादेवाने सनक, सनंदन, सनातन व सनद कुमार ह्या चार कुमारांना गुरुदक्षिणा मूर्ती स्वरूपात ज्ञानमय रहस्य शिकविले होते. बजरंगबली पवनपुत्र हनुमान हे महादेवाचेच एक रूप आहेत. तसेच महादेव हे ब्रह्मदेवाची देखील संहारमयी मूर्ती आहेत. महादेव हे कैलास पर्वतावर निवास करणारे सर्वव्यापी ईश्वर आहेत. प्रभू श्रीरामांच्या भक्तांनी



देखील महादेवाचीच उपासना केली पाहिजे. कारण स्वतः प्रभू श्रीरामाने देखील प्रसिद्ध अशा श्रीरामेश्वर तीर्थस्थानी लंकेस मार्ग क्रमनाच्या वेळी महादेवाची उपासना केली होती. तेथे आज देखील प्रभू श्रीरामांच्या नावाने श्री रामेश्वर ज्योतिर्लिंग स्थित आहे.

महादेव हे प्रभू श्रीरामांचे देखील गुरु होते. स्कंदपुराण व शिवपुराणानुसार महादेव हे एक योगी आहेत जे की नेहमीच तपश्चर्यत लीन असत. महादेवांच्या तपश्चर्यत व्यत्यय येऊ नये म्हणून नंदी देवाला त्यांचे द्वारपाल म्हणून नियुक्त केले गेले आहे आणि कोणत्याही भक्तास आपली मनवांछीत इच्छा महादेवास सांगायची असल्यास ती त्यांनी नंदी देवाच्या कानातच सांगावी अशी एक परंपरा आहे. म्हणूनच महादेवा समोर नंदी देवाची मूर्ती असते. नंदी हे केवळ महादेवाचे वाहन नसून ते त्यांचे परमभक्त, सचिव तसेच शिष्य आहेत. नंदी देव हे नेहमीच महादेवाच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात. महादेवाच्या डाव्या हातात नेहमीच एक त्रिशूळ असतो जे की सत्व, रज व तम ह्या तीन गुणांचे चिन्ह आहे. हे महादेवाच्या ऐश्वर्याचे द्योतक आहे ज्या आधारे ते संपूर्ण विश्वावर शासन करतात. महादेवाच्या उजव्या हातात एक डमरू असून ते ओम ॐ चे व्यंजक आहे ज्या आधारे वांडमयाची उत्पत्ती झाली आहे.

महादेवाच्या मस्तकावरील शिशलेखा असे दर्शविते की त्यांनी स्वतः च्या मनावर पूर्ण ताबा प्राप्त केला आहे. हत्तीला अभिमानमूर्ती मानले गेले आहे म्हणूनच महादेवाने हस्तीचर्म धारण करून अभिमानाचे दमन केले आहे. अशाचप्रकारे व्याघ्र चर्मावर देखील महादेवाचे बसणे हे त्यांनी कामावर विजय प्राप्त केल्याचे दर्शविते. अशा प्रकारे महादेवा जवळ असलेल्या प्रत्येक सूक्ष्म अति सूक्ष्म वस्तुत देखील एक विशाल गुढ रहस्य समाहित आहे. महादेवाचे बारा ज्योतिर्लिंग आहेत ज्याच्या प्रतिदिन सकाळी व संध्याकाळी केवळ स्मरण मात्राने देखील आपल्या जन्म-जन्मांतरांच्या पापांचा सर्वनाश होतो. म्हणूनच आपल्या महादेवाला भोळ्या शंकरा म्हणून देखील संबोधले जाते.

आजच्या महाशिवरात्री महापर्वाच्या निमित्ताने आपणास ह्या सर्व गोष्टींचा आढावा घेतल्याने आजच्या दिवसाचे विशेष महत्त्व जाणवते आणि ही वर्षा-नुवर्षांपासून चालत आलेली परंपरा आहे. तसे तर महादेवाचे नाव हे प्रतिदिन प्रातः स्मरणीय व चीरस्मरणीय असतेच आणि महादेवाच्या नामस्मरणाशिवाय आपल्या दैनंदिन जीवनाची कल्पना देखील केली जाऊ शकत नाही. आज आपण सर्वजण महाशिवरात्रीच्या निमित्ताने काय करणार.....? ? उपवास करणार, मंदिरात जाणार, भजन-कीर्तन करणार इत्यादी. पण एवढे करून देखील खऱ्या अर्थाने आजचे दिवस सार्थक होईल काय ? यावर आपण सर्वांस थोडा विचार करावा लागेल. ज्याप्रमाणे महादेवाने समुद्रमंथनाच्या वेळी निघालेले हलाहल विष स्वतः प्राशन करून स्वतःच्याच कंठात रोखून ठेवले व त्या विषाचा दुष्प्रभाव इतर मानव सृष्टीवर होऊ दिला नाही. अगदी त्याचप्रमाणे मानवाने देखील आपल्या मनातील राग, मत्सर, द्वेष, भेदभाव, असमानता इत्यादी स्वरूपातील विषाचा वर्षाव समोरील इतर कोणत्याही व्यक्तीवर न करता स्वतःच त्याचे आत्मपरीक्षण करून ह्या सर्व विश समान गुणांचा आपल्या अंतर्मनातच सर्वनाश केला पाहिजे. तरच आजचा दिवस खऱ्या अर्थाने सार्थक सिद्ध होईल व शांततेचा संदेश प्रस्थापित होईल. हर हर महादेव.

**-अवधेशसिंह सोलंकी**
गाडीपुरा, नांदेड (महाराष्ट्र)
मो. ८८०५८५५७५१

# संत सेवालाल महाराज : सामाजिक पुनर्जागरणाचे प्रेरणास्थान



१५ फेब्रुवारी हा दिवस केवळ एका संतपुरुषाची जयंती म्हणून साजरा होणारा दिवस नाही, तर तो भारतीय समाजाच्या उपेक्षित, वंचित आणि दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या घटकांच्या सामाजिक आत्मभानाचा उत्सव आहे. या दिवशी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि मध्य भारतात लाखो अनुयायी श्रद्धेने नतमस्तक होतात. मात्र संत सेवालाल महाराजांचे स्मरण केवळ भक्तीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या सामाजिक कार्याच्या व्यापक अर्थाने झाले, तरच ही जयंती खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येईल.

भारतीय समाजरचनेत बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनपद्धतीशी निगडित राहिला आहे. व्यापार, धान्यवाहतूक, गुरांचे कळप, जंगलांशी जोडलेले जीवन आणि सतत स्थलांतर या सगळ्या कारणांमुळे हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. स्थिर निवास नसल्यामुळे शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि राजकीय सहभाग यांपासून तो वंचित राहिला. अशा परिस्थितीत सामाजिक आत्मसन्मान हरवलेला, आत्मविश्वास खचलेला आणि अनेकदा स्वतःच्या अस्मितेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालेला समाज संत सेवालाल महाराजांना लाभला.

संत सेवालाल महाराजांचे महत्त्व याच ठिकाणी ठळकपणे समोर येते. त्यांनी समाजाला प्रथम बाह्य शत्रूंचा नव्हे, तर अंतर्गत दुर्बलतेचा शोध घ्यायला शिकवले. समाजाची दारिद्र्य, उपेक्षा आणि अवहेलना ही केवळ इतरांनी लादलेली स्थिती नाही, तर काही प्रमाणात आत्मविस्मृती आणि विस्कळीतपणातूनही ती निर्माण झाली आहे, हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचा पाया आत्मशुद्धी आणि आत्मसन्मान यांवर आधारित होता.

संत सेवालाल महाराजांच्या विचारविश्वात व्यसनमुक्तीला अत्यंत मध्यवर्ती स्थान होते. त्या काळात मद्यपान, जुगार आणि अनियंत्रित खर्च यांमुळे अनेक बंजारा कुटुंबे आर्थिक व नैतिक अधःपतनाकडे झुकत होती. त्यांनी व्यसनाला वैयक्तिक दोष मानले नाही, तर सामाजिक आजार म्हणून पाहिले. व्यसन केवळ शरीर नष्ट करत नाही, ते विवेक, कुटुंब आणि समाज यांनाही पोखरते, हा त्यांचा ठाम संदेश होता. त्यामुळे त्यांनी कीर्तन, संवाद आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समाजाला संयमाचा मार्ग दाखवला.

त्यांच्या सामाजिक कार्यात श्रमसंस्कृतीचा पुरस्कार हा आणखी एक मूलभूत पैलू होता. श्रम हे लाजिरवाणे नाहीत, तर तेच माणसाचे खरे भूषण आहेत, असा विचार त्यांनी रुजवला. परिश्रमातून मिळवलेले अन्नच पवित्र असते आणि तेच आत्मसन्मान टिकवते, हे त्यांनी समाजाच्या मनात कोरले. भटक्या समाजाला 'आळशी' किंवा 'अविश्वसनीय' अशी लेबले लावली जात असताना, संत सेवालाल महाराजांनी श्रमशीलतेचा गौरव करून समाजाच्या प्रतिमेला नैतिक अधिष्ठान दिले.

स्त्रीसन्मान हा त्यांच्या सामाजिक विचारांचा अत्यंत प्रगत आणि कालातीत पैलू मानला जातो. ज्या काळात स्त्रीला बहुतेक समाजांत दुय्यम स्थान होते, त्या काळात संत सेवालाल महाराजांनी स्त्रीला कुटुंबाची आधारशिला मानले. त्यांनी पुरुषप्रधान मानसिकतेला थेट आव्हान दिले नाही, पण स्त्रीबद्दलचा आदर, संयम आणि जबाबदारी यांची शिकवण देऊन समाजमन बदलण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे शील म्हणजे केवळ तिची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, हा संदेश त्यांच्या विचारांतून स्पष्टपणे उमटतो.

संत सेवालाल महाराजांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडालाही विरोध केला. धर्माच्या नावाखाली चालणारे अवास्तव विधी, आर्थिक शोषण आणि भीती-वर आधारित श्रद्धा यांना त्यांनी स्पष्ट नकार दिला. त्यांचा धर्म हा अत्यंत साधा, माणुसकीवर आधारित आणि व्यवहार्य होता. सेवाच खरी पूजा आहे, हा त्यांचा विचार केवळ आध्यात्मिक नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाचा मंत्र होता. त्यामुळे त्यांच्या शिकवणीत बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणातील शुद्धतेला अधिक महत्त्व होते.

निसर्गाशी असलेले नाते संत सेवालाल महाराजांच्या विचारांत विशेषत्वाने दिसते. जंगल, पाणी, पशुधन आणि भूमी या सगळ्यांवर बंजारा समाजाचे जीवन अवलंबून होते. त्यांनी निसर्गाला केवळ संसाधन न मानता सहजीवी घटक म्हणून पाहिले. वृक्षतोड टाळणे, पाण्याचा सन्मान राखणे आणि प्राणिमात्रांवर दया ठेवणे, हे केवळ नैतिक उपदेश नव्हते, तर जीवनरक्षणाचे तत्त्वज्ञान होते. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हे विचार विलक्षण दूरदृष्टीचे वाटतात.

संत सेवालाल महाराजांचे कार्य केवळ वैयक्तिक सद्गुणांपुरते मर्यादित नव्हते; त्यांनी सामाजिक संघटन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. उपजाती, टोळीभेद, कौटुंबिक वाद आणि अंतर्गत मतभेद यांमुळे समाज विखुरलेला होता. त्यांनी एकतेचा संदेश देत समाजाला सांगितले की, विभाजनामुळे दुर्बलता येते, तर संघटनातून ताकद निर्माण होते. सामाजिक ऐक्य हा त्यांच्या विचारांचा कणा होता. त्यांनी शिक्षणाचा थेट प्रचार केला नसला, तरी त्यांच्या विचारांमुळे पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण झाली. आत्मसन्मान जागृत झाल्यानंतर समाजाने शिक्षणाकडे वळणे स्वाभाविक होते. आज बंजारा समाजातील अनेक युवक-युवती विविध क्षेत्रांत यशस्वी होत आहेत, त्यामागे संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वास आणि स्वत्वाची जाणीव हे बीज आहे. त्यांचे स्वतःचे जीवन अत्यंत साधे, संयमी आणि सेवाभावी होते. सत्ता, संपत्ती किंवा प्रसिद्धी यांचा मोह त्यांनी कधीच बाळगला नाही. समाजासाठी जगणे, समाजासाठी दुःख सहन करणे आणि समाजासाठी मार्गदर्शन करणे हेच त्यांचे जीवनतत्त्वज्ञान होते. त्यामुळेच ते संत होते, पण त्याहून अधिक सामाजिक दिशादर्शक होते.

संत सेवालाल महाराजांचे सामाजिक कार्य त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते; त्याचे परिणाम पुढील अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी समाजमनात जे बीज पेरले, ते पुढे आत्मसन्मान, शिक्षण आणि सामाजिक संघटनाच्या रूपाने अंकुरले. ज्या समाजाला दीर्घकाळ 'भटका', 'मुख्य प्रवाहाबाहेरील' किंवा 'दुय्यम' म्हणून ओळखले गेले, त्या समाजाने हळूहळू आपली ओळख स्वतः घडवायला सुरुवात केली. ही प्रक्रिया सहज किंवा तात्काळ घडलेली नव्हती; पण तिच्या मुळाशी संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वासाचा संदेश होता.

स्वाभिमान ही केवळ भावनिक भावना नसून सामाजिक उभारणीचे बळकट अधिष्ठान असते, हे संत सेवालाल महाराजांनी ओळखले होते. त्यांनी समाजाला स्वतःकडे न्यूनगंडाने पाहू नका, तर आपल्या श्रमशीलतेचा, परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगा, असे सांगितले. हा विचार पुढे बंजारा समाजाच्या सामाजिक चळवळींचा केंद्रबिंदू ठरला. आपल्या अस्मितेची जाणीव झाल्यानंतरच समाज शिक्षण, संघटन आणि हक्कांच्या दिशेने वाटचाल करू शकतो, हे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

स्वातंत्र्योत्तर काळात बंजारा समाजाने जेव्हा शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहायला सुरुवात केली, तेव्हा त्या मागे संत सेवालाल महाराजांच्या विचारांची प्रेरणा होती. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नव्हे, तर ते सामाजिक प्रतिष्ठा, विवेक आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग आहे, ही जाणीव समाजात हळूहळू रुजली. आज विविध विद्याशाखांमध्ये, प्रशासनात, संशोधनात, कला-संस्कृतीत आणि सामाजिक कार्यात जे बंजारा युवक-युवती सक्रियपणे कार्यरत आहेत, त्यांची ही वाटचाल संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा आधुनिक विस्तार म्हणता येईल.

संत सेवालाल महाराजांचे कार्य एका समाजापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणादायी ठरते. त्यांनी मांडलेली सेवा, समता आणि स्वाभिमानाची तत्त्वे कोणत्याही काळात कालबाह्य होत नाहीत. त्यांनी मानवतेचा धर्म शिकविला ज्यात जात, वर्ग किंवा पंथाचे बंधन नाही. त्यामुळेच त्यांचे विचार सर्वसमावेशक आणि सार्वकालिक ठरतात.

आज जेव्हा आपण १५ फेब्रुवारीला संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी करतो, तेव्हा हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा असायला हवा. आपण समाजात व्यसनमुक्तीसाठी काय करतो? स्त्रीसन्मानासाठी किती जागरूक आहोत? पर्यावरणरक्षणासाठी आपले योगदान काय आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण सामाजिक एकतेसाठी किती प्रयत्नशील आहोत? या प्रश्नांची उत्तरे शोधणे हीच जयंतीची खरी फलश्रुती आहे.

संत सेवालाल महाराज यांचे जीवन म्हणजे शांत पण प्रभावी सामाजिक क्रांतीचे प्रतीक आहे. त्यांनी तलवारीने नव्हे, तर विचारांनी समाज बदलला. त्यांनी घोषणा देऊन नव्हे, तर आचरणातून परिवर्तन घडवले. त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही बंजारा समाजासह संपूर्ण समाजाला दिशा देत आहे. या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करूया. स्वाभिमानाने जगणे, श्रमाचा सन्मान करणे, स्त्रीला समान स्थान देणे, निसर्गाचे रक्षण करणे आणि समाजात एकतेचे बंध मजबूत करणे हीच संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक कार्याची खरी ओळख आहे. त्यांच्या विचारांचा हा दीप पुढील पिढ्यांसाठी अखंड तेवत राहो, हीच या जयंती दिनी अपेक्षा.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# अव्यक्त वेदनांचा 'अंतःस्वर' म्हणजे : 'अनाहत'


**पुस्तक परीक्षण**

**बाबाराव विश्वकर्मा**
नांदेड
मो. ९४०३४१८७१८

मराठी साहित्य क्षेत्रात अलीकडे खूप मोठ्या प्रमाणात कवितांचे मळे फुलत आहेत. वसंत ऋतूत सृष्टीच्या अंगोपांगी नवउन्मेष लगडून यावा असे आज कवितेचे झालेले आहे. मराठी वाङ्मयातील कविता सर्वस्थळी बहरत असतांना काही मोजक्या कवींची कविता मात्र सर्वदूर दरवळत आहे. त्यातील आघाडीचे एक महत्त्वाचे कवी म्हणजे व्यंकटेश चौधरी हे आहेत.

व्यंकटेश चौधरी म्हणजे, शिक्षण, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रातील उपक्रमशील कार्यशीलतेने नांदेड जिल्हा परिषद असो की शिक्षणाधिकारी महानगरपालिका नांदेड या दोन्ही ठिकाणी त्यांनी आपल्या स्वतंत्र भूमिकेने एक वेगळेपण सिद्ध केलेले आहे. प्रदीर्घ प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी सामाजिक क्षेत्रातील वंचित बहुजन व एकल, परित्यक्त महिला पुनर्वसन, अनाथ मुलां-मुलींसाठी समुपदेशन, सहकार्य करून आपली सामाजिक संवेदनशीलता व कर्तव्यभावना जपलेली आहे. समाजातील शेतकरी, कष्टकरी, महिला, मजूर, कामगार यांच्याविषयीची तळमळ त्यांच्या वेळोवेळी प्रकाशित झालेल्या साहित्यातून अभिव्यक्त होत गेलेली आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे विलोभनीय व विविधांगी आहे तसे, त्यांचे साहित्यसुद्धा विविधांगी अनुभवांनी चितारलेल्या इंद्रधनुष्याप्रमाणे सर्वांगसुंदर आहे.

व्यंकटेश चौधरी यांचा 'गंधबन' हा पहिला कवितासंग्रह असून नंतर 'एक शून्य प्रतिक्रिया' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह होय. शिक्षणक्षेत्रात कार्यरत असतांना शिक्षकांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी व त्यांना विचार अभिव्यक्त करता यावे यासाठी त्यांनी 'पळस' नावाचे प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे संपादन करून प्रकाशित केले. लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे संयोजक, सुप्रसिद्ध कथाकार दिगंबर कदम यांच्या 'कृतार्थ' या गौरव ग्रंथाचे संपादन अशा अनेक पुस्तकांचे त्यांनी संपादन केलेले आहे. यांसह अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांचे मुद्रितशोधन करून त्यावर व्याकरणीय संस्कार ते सातत्याने करत असतात. त्यानंतर व्यंकटेश चौधरी यांचा आता नव्याने आलेला 'अनाहत' हा कवितासंग्रह नांदेड येथील सुप्रसिद्ध इसाप प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ पुणे येथील सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी आपल्या




खास तरलशैलीत बनविलेले असून, अक्षरमांडणी विजयकुमार चितरवाड यांनी केलेली आहे. अर्थातच 'अनाहत' काव्यसंग्रहाच्या निर्मितीकौशल्याने व त्यातील आशयघन भावाभिव्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधून घेतलेले आहे.

कवी व्यंकटेश चौधरी यांच्या 'अनाहत' या कविता संग्रहातून आलेली कविता 'स्व' आत्माभिव्यक्तीचे आविष्करण करत; प्रेमाच्या विफल भावावस्थेतून प्रकट होत जाणारा एक अव्यक्त वेदनांचा अंतःस्वर आहे.

ही कविता कधी कधी प्रेमाच्या अथांग सागरात डुंबत राहून प्रेमानुभुतीचा ती अखंड आस्वाद घेत राहते. कधी विरहात व्याकुळ होऊन सखीच्या डोळ्यात स्वप्ने पेरतांना धुंद होते, तर कधी उद्ध्वस्ततेनंतर दबून गेलेल्या श्वासासारखी अस्वस्थ करत राहते. मनात ठसठसत असतांनाही हव्याहव्याशा हळव्या वेदनांना कुरवाळत राहते. आपल्या व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू असलेले कवी व्यंकटेश चौधरी हे 'अनाहत'मधील आपल्या पहिल्याच कवितेत आपल्या अव्यक्त प्रेयसीला उद्देशून तिच्या उदात्त आणि निस्सीम प्रेमाशी आपली तुलना करताना म्हणतात..

'तू
अथांग
अनंत
दिगंत
मी
अनंग
भणंग
वसंत'

या कवितेतून कवीने स्वतःसह त्यांची प्रेयशी यांच्यातील नाजूक नात्याचे तुलनात्मक वर्णन केलेले आहे. अल्पाक्षरत्व हे या कवितेचे रूप असून; आशयघन तरल भावाभिव्यक्ती हा या कवितेचा प्राण आहे. त्यातून प्रकट होत जाणारा विविधांगी भावतरंग हे या कवितेचे सौंदर्यस्थळ आहे. कवीने प्रियेसाठी योजिलेले 'अथांग' आणि 'अनंत' हे शब्द प्रेमाच्या अस्सीम, अमर्याद स्वरूपाचे प्रतीक होऊन आलेले आहेत. तर प्रियेसाठी 'दिगंत' हा शब्द वापरलेला आहे. त्यातून कवितेतील तिचे प्रेम आभासी, अनंत अशा 'क्षितिजा'सारखे अमर्याद असून ते कुठेही न संपणारे असे अवीट, अस्सीम असल्याचे वर्णन या कवितेतून कवीने केलेले आहे.

'मी'चा उल्लेख करून चिंतनाच्या पातळीवर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी 'अनंग' हा शब्द कामदेवाचे दुसरे नाव असून जे प्रेम आणि आकर्षणाचे प्रतीक म्हणून आलेला आहे. 'भणंग' म्हणजे भटकणारा किंवा निराश्रीत असा होत असून, कवी प्रेमभावनेचा अस्सीम भुकेला आहे. त्यासाठी कवीने योजिलेला 'भणंग' हा शब्द भटकणाऱ्या अतृप्त मानवी मनाचे प्रतीक होऊन आलेला आहे. दोघांचे मिलन झाल्यावर ती भावाभिव्यक्त करते, तेव्हा तो 'वसंत' ऋतुसारखे सर्वांगाने फुलून येतो. आनंदाची अनुभूती व्यक्त करतो. प्रेमातील विविध भावतरंग व्यक्त करतांना आत्मचिंतनाच्या सखोल पातळीवर हळवेभाव निसर्गातील प्रतीक आणि प्रतिमांचा वापर करून मानवी मनातील भावभावनांना कवीने व्यक्त केलेले आहे. प्रिय व्यक्तीच्या सहवासाची, एकमेकांना भेटण्याची आतुरता असहाय्यतेला पोहोचते. त्यांचे देहातीत मिलनानंतर तृप्तीची अनुभूती व्यक्त करणारे वर्णन करताना कवी म्हणतो..

'बघ,
एका अनावर
आवेगा नंतर
शांत झालेत
त्यांचे श्वास आता नाहीत मोहवणार,कसलेच कोणतेच भास, ही ग्लानी की समाधी, कोणती ना कोणास भ्रांत'या मिलनातून अपारशांतीची अनुभूती प्राप्त होते. मनाला मग कोणतेच भास खुणावत नाहीत. ती दोघेही एका अविचल अशा स्थिर मनोवस्थेला प्राप्त होतात. तो एक एक क्षण ध्यानस्थ समाधीसारखं अनंततृप्तीची अपार अनुभूती देतो.

कवी व्यंकटेश चौधरी यांच्या कवितेत आलेल्या भणंग,वेदनांचे घर, तलखीचे घाव, पांगुळगाडा, उध्वस्त गाव, शंकेचं बीज, सांजसावल्या, स्वप्नांची वस्ती, चांदणराती, स्तब्ध श्वास, जुन्या जखमा, हळवा कोपरा, मेघ मल्हार, व्याकुळलेले ढग, देहभर दरवळ, भूतकाळाच्या वाती, संमोहन, अनावर हुरहूर, जीवजाळी स्पर्श, कल्पनेचा मेणा, पुनवराती, आत्मगंधी, चांदचुरा यांसारख्या अनेक प्रतिमा व प्रतिकांमुळे ही कविता अधिकच भावविभोर आणि आशयघन झालेली आहे. या कवितेचे अल्पअक्षरत्व हे एक मुख्य वैशिष्ट्य असून चपखल-पणे केलेली शब्दांची कसरत ही अव्दितीय आहे. भौतिकाच्या अमर्याद गाळात अडकल्यामुळे कळत नकळत आलेल्या 'अंधारी'मुळे तिची पुनर्रूक्ती झालेली असल्याचे जाणवते इतकच, बाकी हा साकारलेला आठवणीचा कशिदा विणतांना कवीच्या भावव्याकूळ तरलतेची जाणीव प्रत्येक वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही. ही कविता वाचतांना प्रत्येक वाचकाला आपल्या आयुष्याच्या पूर्वरंगाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कालातीत असलेली ही कविता म्हणजे एका अव्यक्त वेदनेचा अंतःस्वर आहे.

कवी व्यंकटेश चौधरी हे साहित्य सागरात उजळ माथ्याने जाणिवेच्या नावेतून साहित्यप्रवास करणारा नावाडी आहे. त्यांच्या लेखणीतून अशा असंख्य अनाहत ध्वनींचा शब्द प्रवाह खळाळत राहो, ही प्रांजळ अपेक्षा!

**पुस्तक : 'अनाहत' (कवितासंग्रह)**
**कवी : व्यंकटेश चौधरी**
**प्रकाशक : इसाप प्रकाशन, नांदेड**
**मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी, पुणे**
**मूल्य- २४० रु.**

## भोळा शिव

देवांचा हा देव! भोळा तुझा भाव!
घेतो मज ठाव! महादेव!!
ॐ नमः शिवाय! मंत्रात हो शक्ती!
भोळी माझी भक्ती! देवा तुझी!!
नित्य सेवा तुझी! करतोय राजी!
काळजी घे माझी! तुचं देवा!!
जीवन देतोय! सर्व करतोय!
तू चालवतोय! चक्र सारं!!
कृपा तुझी झाली! उभारी तू दिली!
शरीरात आली! धडधड!!
शंकर पार्वती! एकरूप दोघं!
आवळतो राग! नामघेत!!
जळी स्थळी भासे! चोहीकडे दिसें!
आस तुझी असे! भेटण्याची!!
प्रदीप रोजचं! पुजन करतो!
अभंग लिहतो! तुझ्या मुळे!!

**-प्रदीप मनोहर पाटील**
गणपूर, ता. चोपडा
जि. जळगाव
मो. ९९२२२३९०५५

## जगात क्वांटीटीच्या..

गेलो दुकानात पुस्तकांच्या आणि विचारलं,
दोन पुस्तकांमधील फरक म्हणाला दुकानदार,
एक थोडे स्वस्त आणि दुसरे थोडे महाग.
मी म्हणालो, मी पुस्तकांच्या कॉलिटीबद्दल बोलतोय,
दुकानदार म्हणाला, हल्ली क्वांटिटी जास्त विकते,
मी म्हणालो मग कॉलिटी चे काय,
तो म्हणाला कॉलिटी म्हणजे, नेमके असते तरी काय ?
मी म्हणालो गुणवत्ता पूर्ण पुस्तके वाचायला पाहिजेत, तो म्हणाला
संपलेल्या काळाची गोष्ट कशाला,
तुम्ही बोलताय आता साहेब.
काळ क्वालिटीचा, सगळीकडेच
संपलाय आता बहुदा,
जगात क्वांटीटीच्या गोष्टी क्वालिटीच्या,
वाटतात वेस्ट आता बहुदा...

**-प्रा. अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

# जो काम करतो, त्यांच्या पाठीशी गावकऱ्यांनी राहणे आवश्यक -आ. चिखलीकर

## सिमेंट रस्त्याच्या कामाचे आ. चिखलीकर यांच्या हस्ते भूमिपूजन



**लोहा (प्रतिनिधी)** – जो काम करतो त्यांच्या पाठीशी गावाने राहिले पाहिजे, असे प्रतिपादन लोहा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. हिप्परगा येथे लोहा-चितळी-पेंडू रस्त्याच्या परभणी जिल्हा सिमेपर्यंतच्या ९९.८ लक्ष रुपयांच्या विकास निधीच्या सिमेंट रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते.

लोहा तालुक्याच्या शेजारी असलेल्या पालम तालुक्यातील प्रसिद्ध व जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेंडू येथील श्री निवृत्तीनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी व लोहा तालुक्यातील भाविक भक्तांना दळणवळणाची चांगली सोय व्हावी यासाठी लोहा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून जि. प. बांधकाम विभागांतर्गत ९९.८ रुपयांचा निधी रस्त्याच्या कामांसाठी मंजूर करण्यात आला असून, त्या कामाचे भूमिपूजन दि. १३ फेब्रुवारी रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप मारोतराव महाराज हिप्परगेकर होते तर प्रमुख उपस्थितीत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रवीण पाटील चिखलीकर, लोहा पं. स. चे गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, जि. प. बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता शिवाजी राठोड, लोहा न. प. चे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, सरपंच बालाजी पाटील, चितळीचे सरपंच उध्दवराव पाटील सूर्यवंशी, अविनाश पाटील सूर्यवंशी, दापशेडचे सरपंच विरभद्र राजुरे, अन्सार खाँ पठाण, माधव पाटील अन्नकाडे, पेनूरचे माजी सरपंच बाबाराव पाटील गवते, बेरळीचे माजी सरपंच संदीप होळगे, सुरेश पा. ढेंबरे, तुकाराम पा. लोंढे, माधव पाटील जामगे, देऊळगावचे सरपंच मारोतराव सोनवळे, सतीश पाटील बाबर, रंगनाथ पवार, संभाजी कोरडे, बंडू पाटील वडजे आदी उपस्थित होते.

## लव्हेकर हॉस्पिटल येथे आज बहिरेपणा तपासणी व उपचार शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– बहिरेपणा तपासणी आणि उपचार शिबिराचे आयोजन रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत लव्हेकर हॉस्पिटल, वजिराबाद, नांदेड येथे करण्यात आले आहे.

लवेकर हॉस्पिटल येथे अत्याधुनिक अशा २ साउंड प्रूफ तपासणी कक्ष आणि मशीनच्या ट्रायल रूम्स उपलब्ध आहेत. तसेच प्रशिक्षित २ श्रवण, वाचा दोष तज्ञ, विविध शासकीय, खाजगी आरोग्य योजना आहेत. अशी शिबिरे वर्षभरात नेहमी आयोजित केली जातात.

कानाच्या समस्या हा एक सार्वत्रिक अनुभव आहे जो दुर्लक्ष केल्यास मोठ्या आजारात रूपांतरित होऊ शकतो. सध्याच्या वेगवान जगात कानाचे अनेक आजार विशेषतः बहिरपणा वाढला आहे. वयोमाननुसार नैसर्गिक कमी ऐकू येणे, कानात आवाज, कानात सर्दी जमा होणे, मोबाईल/इयर फोनच्या अतिवापराने कान दुखणे, कानातून पाणी येणे,ॲलर्जी, तोंड, घसा यातील गाठी, चक्कर येणे, नाकातून रक्त येणे, नाकाचे हाड वाढणे, नाकाचे हाड वाढणे, नाकात कोंब व मास वाढणे आदींवर उपचार करण्यात येणार आहेत. या संदर्भात लव्हेकर हॉस्पिटलकडून माहिती, निदान, उपचार (बहिरेपणासाठी मशीन बसवणे) शिबिराचे रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप



**नांदेड (प्रतिनिधी)**– सेवा नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण शिबिराचा समारोप नुकताच पार पडला. या शिबिरात प्रयोगशाळा सहाय्यकांचे तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक कौशल्ये, आरोग्यविषयक जाणीव, कार्यालयीन संवाद, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथील प्राचार्य डॉ. नागेश जानराव यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. जानराव यांनी, आज येथे मिळालेले ज्ञान उद्या प्रत्यक्ष सेवेत उतरले तरच या प्रशिक्षणाचा खरा उपयोग होईल, असे प्रतिपादन केले.

प्रशिक्षण शिबिरात आर्थिक साक्षरता, मानवी मूल्यांचे महत्त्व, जडसंग्रह नोंदवही, भावनिक, मानसिक व सामाजिक आरोग्य, शाश्वत विकास, प्रयोगशाळा सहाय्यकांची भूमिका, जबाबदाऱ्या व गुणवत्तापूर्ण सेवा, आरोग्यदायी जीवनशैली, आहार नियंत्रण व शिस्तबद्ध दिनचर्या यावर डॉ.मोहन मैड यांनी मार्गदर्शन केले. प्रभावी व कार्यालयीन संवाद कौशल्यांवर डॉ.योगिनी सातारकर, भावनिक, मानसिक व सामाजिक आरोग्य व प्रथमोपचार या विषयावर मानसोपचार तज्ञ डॉ.मोहित सोलापुरकर, जडसंग्रह नोंदवही, भांडार पडताळणी व निर्लेखन या विषयावर प्रा.विजय उश्केवार, आरोग्यावर कामाचा ताण या विषयावर फिनिक्स हॉस्पीटलचे डॉ. अनंत सूर्यवंशी, कौशल्य विकासावर प्रा. अब्दुल हदी, तर संगणकाचा वापर व कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर डॉ. संतोष चौधरी, प्रा. शीतल भोकरे व प्रा. नजमा इनामदार यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, कर्तव्ये, जबाबदाऱ्या व निवृत्ती लाभ याबाबत लक्ष्मण मु. जाधव यांनी सविस्तर माहिती दिली.

या प्रशिक्षणामुळे प्रयोगशाळा सहाय्यकांमध्ये आत्मविश्वास वाढला असून आरोग्य, शिस्त, वेळ व्यवस्थापन, तंत्रज्ञान व संगणक वापराबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाल्याचे प्रशिक्षणार्थींनी मनोगतातून व्यक्त केले. तसेच सेवा नियम, कर्तव्ये व निवृत्ती लाभ याबाबत स्पष्टता मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. सदर प्रशिक्षण शिबिर हे केवळ माहिती देणारे नसून प्रयोगशाळा सहाय्यकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, सेवाभाव वृद्धिंगत करण्यासाठी व कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरावे, अशी अपेक्षा प्रा. सूर्यकांत कुलकर्णी यांनी व्यक्त केली. सहभागी प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणातील मार्गदर्शन प्रत्यक्ष कामकाजात अंमलात आणण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयोगशाळा सहायक संघटनेचे अध्यक्ष बालाजी सरोदे, प्रा. सूर्यकांत कुलकर्णी, डॉ. संतोष चौधरी, गणेश नंदे, माधव हिवरे, प्रा. संजय कंधारे, प्रा. अभय आढावे, प्रा. गणपत डक, डॉ. अनघा जोशी, प्रा. अनुराधा साळुंके, डॉ. जयंत माळाकोळीकर, राहूल पोहरे, गणेश मंचेवार, ज्योती गलांडे, शंकर परोडवाड, सुभाष मुनेश्वर, विजय फुलवळकर, वैशाली पाशिमे, ज्ञानेश्वर वानखेडे, सुबोध झडते, श्रीमती पंचफुला कुरुडे, बाबाराव हुरदुके आदींनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचलन बालाजी सरोदे यांनी केले तर आभार प्रा. सूर्यकांत कुलकर्णी यांनी मानले.

# उपवासाला भगर खाताना काळजी घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्ल्यामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात व नांदेड जिल्ह्यात यापूर्वी घडल्या आहेत. भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परजिलस प्रजातीच्या बुरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये तयार होतात. दमट वातावरण बुरशीच्या वाढीसाठी अनुकूल असते. अशा बुरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी उपवासाला भगर खाताना काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करा, शक्यतोवर पाकीटबंद भगर घ्या, ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे व सुटी भगर घेऊ नका, भगर घेताना पाकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकण बंद डब्यात ठेवा, जेणेकरून वातावरणातील ओलाव्यामुळे बुरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका. शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे पिठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी. भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा. भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तीन दिवस सलग उपवास असताना या पदार्थांचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थांचे सेवन पचनशक्तीनुसार मर्यादितच करावे. भगरीचे सेवन करताना या गोष्टी लक्षात ठेवा. म्हणजे संभाव्य अपाय टाळता येईल. विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी.

भगर खरेदी करताना घाऊक विक्रेत्यांकडून पावती घ्यावी. भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना क्र., पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्या. मुदतबाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये. सुटी भगर व खुले भगर पिठ शक्यतो विक्रीसाठी ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.

# ईव्हीएम हटाओ आमरण उपोषणास काँग्रेसचा पाठिंबा -राजेश पावडे



**नांदेड (प्रतिनिधी)** – आगामी सर्व निवडणुका ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर घ्याव्यात या प्रमुख मागणीसाठी लिंबगाव येथील तरुण सुनील पाटील धानोरकर यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. ईव्हीएम हटाओ आमरण उपोषणास खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह पूर्ण नांदेड काँग्रेस पक्षाचा जाहीर पाठिंबा असून, शासनाने या उपोषणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांनी केली आहे.

लिंबगाव येथे ईव्हीएम मशीन ऐवजी बॅलेट पेपरवर आगामी निवडणुका घेण्यात याव्यात या प्रमुख मागणीसाठी सुनिल पाटील धानोरकर यांनी १० फेब्रुवारीपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणस्थळी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांनी शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी रोजी भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना राजेश पावडे म्हणाले की, जिल्हाधिकारी कार्यालयापुढे काँग्रेस पक्षाचे सोमवारी नियोजित आंदोलन आहे. यावेळी देखील ईव्हीएम हटाओची मागणी करणार आहोत. सर्वत्र राज्य व केंद्र सरकार विरोधी प्रचंड असंतोष आहे. जनता नाराज आहे. तरी देखील महायुतीचा विजय होतो, ही कृपा ईव्हीएममुळे व मतदार यादीतील घोळामुळे शक्य आहे, अशी टीका राजेश पावडे यांनी केली.

दरम्यान या आंदोलनाची दखल तातडीने शासनाने घ्यावी, आमरण उपोषणामुळे सुनील धानोरकर यांची तब्येत बिघडल्यास त्यास शासन जबाबदार असेल असे देखील ते म्हणाले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्ट ऑफ लिव्हिंग, नांदेड आयोजित महाशिवरात्री विशेष रुद्रपूजा

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, नांदेड यांच्या वतीने रुद्रपूजा या प्राचीन व प्रभावी वैदिक विधीचे आयोजन करण्यात आले आहे. हा आध्यात्मिक सोहळा रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता लीला बँकेट हॉल, वीआयपी रोड, ग्लोबल हॉस्पिटलजवळ, बाफना ज्वेलर्सच्या वर, नांदेड येथे संपन्न होणार आहे.

रुद्रपूजा ही वैदिक मंत्रोच्चारांनी संपन्न होणारी पवित्र अभिषेक विधी असून, महाशिवरात्रीच्या दिवशी तिचे विशेष महत्त्व मानले जाते. या पूजेद्वारे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. तसेच मानसिक शांती, उत्तम आरोग्य, समृद्धी आणि पर्यावरणशुद्धीचा अनुभव मिळतो, असे मानले जाते. नकारात्मक ऊर्जा दूर करून जीवनातील अडथळे, ग्रहदोष आणि मानसिक तणाव कमी करण्यासाठी हा विधी फलदायी ठरतो.

आर्ट ऑफ लिव्हिंगमध्ये रुद्रपूजेचा संकल्प घेण्यामागील उद्देश म्हणजे आंतरिक शांती, सर्वांगीण समृद्धी, मनोकामना पूर्ती आणि आध्यात्मिक प्रगती साधणे हा आहे. संकल्पाद्वारे व्यक्ती स्वतःसाठी तसेच कुटुंब, समाज आणि पर्यावरणाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतो. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, सर्व नांदेडकरांसाठी खुले आहे. आयोजकांनी नागरिकांना आपल्या कुटुंबीय व मित्रपरिवारासह उपस्थित राहून या अनुभूतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# लिटिल स्टार पब्लिक स्कूलचे स्नेह संमेलन संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– लिटिल स्टार पब्लिक स्कूल प्रि-प्रायमरी, गणेश नगर रोड आणि सिडको नांदेड ह्या दोन्ही शाखेचे स्नेह संमेलन हॉटेल ताज पाटील येथे नुकतेच संपन्न झाले.

या स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लोपामुद्रा आनेराव (एएसआय) नांदेड, अस्मिता गायकवाड (स. गटविकास अधिकारी), लातूर, ॲड. दीपा बियाणी (संपादिका मानवी पुरवणी प्रजावाणी), समाजसेविका अनुजा डोईफोडे (संपादिका मानसी पुरवणी, प्रजावाणी), समाजसेविका तसेच मधुकर गायकवाड (विद्यादान कोचिंग क्लासेचे संचालक सिडको) तसेच मोठ्या प्रमाणात पालकवर्ग उस्थित होता.

कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई जयंतीने झाली. चिमुकल्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली. मुली व महिला खरच सुरक्षित आहेत का? 'नारी शक्ती ड्रामा' चिमुकल्यांनी सादर करुन प्रेक्षकांची व प्रमुख पाहुण्यांचे मने जिंकली. तसेच चिमुकल्यांनी वेगवेगळे ग्रुप डान्स, सोलो डान्स व ॲक्टमधून आपले कौशल्य दाखवले. यासाठी शाळेच्या संचालिका सुनंदा कदम व शिक्षिकांनी तसेच नृत्य शिक्षक वाजिद यांनी मेहनत घेतली. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा आजी-आजोबांचा मुलांकडून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल एडके यांनी केले तर आभार स्वाती कदम यांनी मानले.

## तीर्थक्षेत्र आळणीबुवा मठ देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्यावर बोगदा करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– वाजेगाव- लातूर फाटा ते दूध डेअरी चौरस्ता (धनेगाव) विणकर वसाहत इथपर्यंत बोगदा मंजूर करण्यात यावा, या रस्त्यावरून मुजामपेठ आणि धनेगाव येथील नागरिकांना गट ग्रामपंचायतच्या कामासाठी तीन किलोमीटरचा फेरा मारून जावे लागत आहे. एवढेच नाही तर या ठिकाणी तीर्थक्षेत्र असलेले आळणीबुवा मठ देवस्थान आहे.

तालुक्यातील धनेगाव/मुजामपेठ गट ग्रामपंचायत कार्यालयाने माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत पाठपुरावा केला. गावकऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी पाच बोगदे मंजूर करण्यात यावे यासाठी मागील काही वर्षापासून या भागातील नागरिकांनी अनेक वेळा वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहारही केला. एवढेच नाही तर नागपूर, दिल्ली येथे केंद्रीय परिवार मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदन दिले. धनेगाव/मुजामपेठ येथील कायमस्वरूपी राहणारे नागरिक असून त्यांना बोगदा नसल्यामुळे मुख्य रस्त्यावरून ये- जा करावी लागत आहे. यामुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण या ठिकाणी शाळकरी मुलं-मुली तसेच ग्रामपंचायत कामासाठी ये-जा करणारी मंडळी आणि आळणीबुवा मठ याच परिसरात असल्याने भक्तांसह नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

# इंदिरा गांधी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून आर्थिक मदत व शैक्षणिक साहित्य वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– इंदिरा गांधी हायस्कूल हडको येथील सन १९८६ च्या माजी विद्यार्थ्यांकडून २०२६ मधील दहावी वर्गातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप व काही होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली.

सामाजिक बांधीलकी जोपासत इंदिरा गांधी हायस्कूलच्या सन १९८६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, आर्थिक मदत देऊ केली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातील अव्वर सचिव सरोजताई पुराणिक यांच्या संकल्पनेतून कै.स्वाती बासरकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ दहावी परीक्षा देणाऱ्या २५० विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड, पेनचे पत्रकार रमेश ठाकूर व सहशिक्षिका क्षमा बेताळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक जी. एम. शिंदे, पर्यवेक्षक डॉ. ए. डी.गरड, रमेश सज्जन, कार्यालयीन प्रमुख एस. बी. घाटोड, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

अशा पद्धतीच्या शैक्षणिक मदतीच्या उपक्रमाचे याप्रसंगी अनेकांनी कौतुक केले. तसेच भविष्यात देखील असे उपक्रम होतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदत

**नांदेड (प्रतिनिधी)**– महिला व बालविकास विभागाच्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेत झालेल्या त्रुटी दुरुस्त करण्यासाठी लाभार्थी महिलांना पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ज्या लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यापैकी काहींनी कुटुंबातील सदस्य सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेत नियमित/कायम/कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत नसल्याबाबत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नसल्याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडला असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन ई-केवायसीमध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा ३१ मार्च २०२६ पर्यंत https://ladakibahin.maharashtra.gov.in या अधिकृत पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# भागवत चन्नावार यांचे निधन



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक, नामांकित व्यापारी भागवत तुकाराम चन्नावार यांचे दि. १३ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. कै. भागवत चन्नावार यांच्या पार्थिवावर लोहा येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत रात्री ८.३० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

# सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी बापूसाहेब पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)** – काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने व खा. रवींद्र चव्हाण यांच्या शिफारसीने सिडको-वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी बापूसाहेब पाटील यांची निवड करण्यात आली आहे. शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी काँग्रेस पक्ष कार्यालय येथे खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, ओबीसी प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे आदींसह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ व २० या भागांचा समावेश असलेल्या सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी जिल्हा प्रवक्ते तथा अर्धापूर तालुका काँग्रेस कमिटीचे प्रभारी बापूसाहेब पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खा. रवींद्र चव्हाण यांच्या शिफारशीनंतर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने काँग्रेस प्रदेश कार्यालयाकडून बापूसाहेब पाटील यांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले. दरम्यान पक्ष कार्यालय येथे शनिवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी नियुक्ती पत्र देण्यात आले.


यावेळी खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, प्रदेश सरचिटणीस अॅड. सुरेंद्र घोडसकर, कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, नगरसेवक सत्यपाल सावंत, पप्पू पाटील कोंडेकर, सुरेश हाटकर, बालाजी चव्हाण, कुमार कुर्तडीकर, अजिज कुरेशी, गोविंद बाबा गौड, अंबादास रातोळे, शंकर शिंदे, गोविंद पाटील, प्रकाश दिपके, अझहर भाई आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी उद्या महिला लोकशाही दिन

**नांदेड (प्रतिनिधी)**– समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. या लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधनी प्रशिक्षण केंद्र, एसबीआय एटीएमच्या मागे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधित समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## चैतन्यनगर शिवमंदिर येथे महाशिवरात्रीची जय्यत तयारी



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील चैतन्यनगर परिसरातील शिवमंदिर येथे महाशिवरात्रीची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

महाशिवरात्री निमित्त १४ क्विंटल फराळाची व्यवस्था करण्यात येत आहे. महाशिवरात्रीनिमित्त सुमारे ५० हजार भाविक भक्त या उत्सवात सहभागी होतात. मंदिर समितीचे अध्यक्ष माधवराव पटने यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समिती कार्यरत आहे.

चैतन्यनगर येथील शिव मंदिरात महाशिवरात्रीची जय्यत तयारी सुरू असून, भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन मंदिर व्यवस्थापन समितीने सर्व खबरदारी घेतली आहे. पोलीस प्रशासन भाविकांना दर्शन सुरळीत व्हावे यासाठी बंदोबस्त तैनात करणार आहे. महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

शिवमंदिर परिसरात विद्युत दिवे लावून मंदिर झगमगाट केले आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष माधवराव पटने, प्रा. प्रभाकर उदगीरे, नंदकुमार दुधेवाड, डॉ. सुभाष हुरणे व विश्वस्त मंडळाने केले आहे.


दरम्यान डॉ. हुरणे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

# चंदेरी

## अभिनेता वरुण धवनची विशेष मुलाखत

# लोक कष्टाने कमावलेले पैसे खर्चून थिएटरमध्ये येतात, चित्रपट त्या लायकीचे हवेत!

**वरुण धवन हा बॉलीवूड इंडस्ट्रीतील अशा नायकांपैकी एक आहे ज्याने वेळोवेळी भूमिका निवडताना त्या आव्हान म्हणून स्विकारल्या. एकेकाळी कमर्शियल आणि कॉमिक हिरो म्हणून प्रतिमा असलेल्या वरुणने बदलापूर, अक्टूबर, भेडिया आणि सनी संस्कारी की तुलसी कुमारी सारख्या चित्रपटांमधून विविध भूमिकांमध्ये स्वतःला सिद्ध केले. सध्या तो त्याच्या अलिकडच्या ब्लॉकबस्टर बॉर्डर २ मुळे चर्चेत आहे. सध्या बॉक्स ऑफिसवर लाखोंची कमाई करणारा वरुण भविष्यातील भूमिकांबद्दल सावध दिसून येतो. वरुणने बॉर्डर २ साठी ट्रोलिंग, त्याचे वडील डेव्हिड धवन यांच्याकडून मिळालेले धडे आणि त्याच्या यशाबद्दल सांगितले.**



बॉर्डर २ चित्रपटातील 'घर कब आओगे' गाणे रिलीज झाल्यानंतर वरुण धवनच्या अभिनयावर आणि विशेषतः हसण्यावर इन्फ्लुएन्सर्स आणि सोशल मीडियावर टीका झाली. ट्रोलर्सनी 'क्रुक्ड स्माईल' (वाकडं हसू) म्हणून हिणवले. ट्रोलिंगच्या मुद्द्यावर वरुण म्हणतो, की आजकाल सर्वांनाच ट्रोल केले जाते. ती फॅशनच झाली आहे. काही लोक ते हाताळू शकतात, काही नाही. सुदैवाने मी ते फारसे गांभीर्याने घेतले नाही. त्यावेळी माझ्या कुटुंबाने मला खूप पाठिंबा दिला.

### सलमान खानने केला कॉल

वरुणने असेही सांगितले, की कुटुंबाव्यतिरिक्त बॉलीवूड इंडस्ट्रीकडूनही पाठिंबा मिळाला. सलमान खान यांनी काल रात्री फोन केला. मला तुझा अभिमान आहे बेटा, हे त्यांचे हे शब्द माझ्यासाठी खूप मौल्यवान आहेत. कारण ते कोणाचीही सहज प्रशंसा करत नाहीत, असे वरुणने सांगितले. सर्वांना माहिती आहे की वरुण धवन हा प्रसिद्ध चित्रपट निर्माते डेव्हिड धवन यांचा मुलगा आहे. वडिलांकडून त्याने शिकलेल्या सर्वात मोठ्या धड्याबद्दल वरुण म्हणतो, की माझे वडील गंभीर आजारी होते आणि त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. आम्ही मुंबईबाहेर शूटिंग करत होतो. मी माझ्या वडिलांना भेटण्यासाठी मुंबईला परतलो. मला पाहताच वडील म्हणाले, की तू मुंबईत परत कसा येऊ शकतोस? तू शूटिंग करत आहेस ना? मी त्या क्षणी इतका भावनिक झालो की मी म्हणालो, की मी शूटिंगला परत जाणार नाही. मी इथेच राहीन. मग माझे वडील म्हणाले, की आम्ही चित्रपट बनवतो. आमचे काम लोकांचे मनोरंजन करणे आहे. निर्मात्याने खूप पैसे गुंतवले आहेत, म्हणून तू उद्या परत जा आणि तू ज्या शूटिंगला बोलावले आहेस त्या वेळी हजर राहा. त्यावेळी माझे वडील माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. म्हणजे, जेव्हा तुम्ही आयुष्यात इतक्या अडचणींमधून जात असता तेव्हा ट्रोलिंग ही एक छोटीशी गोष्ट असते.

### भूतकाळातील यश विसरतात...



वरुण कबूल करतो की तो एक अभिनेता म्हणून विकसित झाला आहे. तो म्हणतो, की जर तुम्हाला यश मिळाले तर ते कायमचे टिकत नाही. लोक दर शुक्रवारी तुमचे भूतकाळातील यश विसरतात. एक अभिनेता म्हणून तुम्हाला स्वतःला पुन्हा सिद्ध करावे लागते. इंडस्ट्रीची हीच पद्धत आहे. जर लोकांनी त्यांच्या कष्टाने कमावलेले पैसे थिएटरमध्ये येण्यासाठी खर्च केले तर तुमचा चित्रपट त्याच्या लायकीचा असला पाहिजे. मला भविष्यात अधिक मेहनत करावी लागेल. मी अनेक आव्हानांना तोंड देण्यास तयार आहे. मला चित्रपट निर्मात्यांकडून आव्हानात्मक भूमिका हव्या आहेत, म्हणून मी कोणतेही चित्रपट साइन केलेले नाहीत. पण मी हे देखील म्हणू इच्छितो की विनोद खूप कठीण आहे. पण मला माहित आहे की मला एक अभिनेता म्हणून विकसित होत राहावे लागेल.

### पत्नी नताशा दलालने दिला सल्ला...

'बॉर्डर २'मधील अभिनयाबद्दल पत्नी नताशानं दिलेली प्रतिक्रिया अतिशय स्पष्ट आणि थेट होती, असे वरुणने सांगितलं. ती म्हणाली, की जास्त पोस्ट करू नकोस, जास्त दिसू नकोस, जास्त बोलू नकोस. घरीसुद्धा ती म्हणते की, जास्त बोलू नकोस, बाहेरही तेच सांगते- जास्त बोलू नकोस. वरुण हा 'बॉर्डर २'मधील पात्र परमवीर चक्र प्राप्तकर्ता कर्नल होशियार सिंग दहियासाठी योग्य आहे की नाही याबाबत शंका निर्माण केल्या गेल्या होत्या. मात्र वरुण शांत राहिला आणि त्याने कामातून उत्तर दिले.

# अतिरेकी प्रेमावर नाही, माझा विश्वास खऱ्या प्रेमावर!



## तृप्ती डिमरीची विशेष मुलाखत

**'लैला मजनू' सारख्या उत्कट प्रेमकथेने अभिनय कारकिर्दीची सुरुवात करणारी तृप्ती डिमरी सध्या 'ओ रोमियो' या आणखी एका प्रेमकथेमुळे चर्चेत आहे. वास्तविक जीवनात मात्र ती खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवते, अतिरेकी प्रेमावर नाही... तृप्ती म्हणते, की प्रेमाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. मी फक्त खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवते. मला अतिरेकीपणाने केलेले प्रेम समजत नाही... तृप्ती डिमरीचा नवीन चित्रपट व्हॅलेंटाईन डेला प्रदर्शित होत आहे, परंतु ती म्हणते, की ती प्रेमाच्या या खास दिवसाबद्दल जास्त उत्सुक नाही...**

तृप्ती डिमरीने तिच्या वैयक्तिक आयुष्यात प्रेमाचा अर्थ काय आहे यावर चर्चा केली. ती म्हणते, की व्हॅलेंटाईन डेवर मी कधीही काही खास केले नाही. या वेळी मी माझा चित्रपट पाहून



हा खास दिवस नक्कीच साजरा करेन, असे ती म्हणाली. शाहीद कपूर, तृप्ती डिमरी, अविनाश तिवारी, दिशा पटानी, तमन्ना भाटिया, विक्रांत मेस्सी, नाना पाटेकर आणि फरीदा जलाल स्टारर 'ओ रोमियो' हा चित्रपट १३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात तृप्तीने तीन वर्षांत तीन चित्रपट केले, परंतु 'ॲनिमल'च्या यशानंतर तिच्याकडे चित्रपटांची गर्दी आहे. २०२४ मध्येच ती बॅड न्यूज, विकी विद्या का वो वाला व्हिडिओ आणि भूल भुलैया ३ मध्ये दिसली. येत्या काळात ती ओ रोमियो, स्पिरिट आणि माँ बहन सारख्या मोठ्या चित्रपटांमध्ये दिसणार आहे. दीर्घकाळ नकार आणि प्रतीक्षेनंतर प्रत्येक चौथ्या किंवा पाचव्या चित्रपटासाठी ऑफर मिळत आहेत, या यशाबद्दल तृप्ती म्हणते, की माझ्यासाठी हा खूप आनंद आहे की प्रत्येक चौथा किंवा पाचव्या आठवड्यात चित्रपट माझ्याकडे येत आहे. मला प्रत्येक दुसरा चित्रपट माझ्याकडे यावा असे वाटते...

### संघर्षातून यशाचे मूल्य समजते...

तृप्ती म्हणते, की मी बऱ्याच काळापासून अभिनेत्री बनण्याचा प्रयत्न करत आहे, पण जेव्हा मला संधी मिळाली तेव्हा मला चांगल्या लोकांसोबत काम करण्याची संधी मिळाली. तथापि, तरीही मला कधीही अपयश आल्यासारखे वाटले नाही. मी ऑडिशनसाठी गेलो तेव्हाही मी खूप आनंदी होते. तो एक वेगळा अनुभव होता. आज जे घडत आहे तो एक वेगळा अनुभव आहे. खरे सांगायचे तर, जर मी ते दिवस पाहिले नसते तर कदाचित मी माझ्या करिअरला आज जितके महत्त्व देतो तितके मी दिले नसते.

### अभ्यास टाळण्यासाठी अभिनेत्री...

तृप्ती डिमरीने जेव्हा अभिनयात करिअर करण्याचा निर्णय घेतला तेव्हा तिचे पालक खूप घाबरले होते. ते तिच्या निर्णयावर फारसे खूश नव्हते, परंतु आता ते तिचे यश पाहून खूप आनंदी आहेत. त्यांच्या विचारसरणीतील बदलाबद्दल तृप्ती म्हणते, की ते आता नक्कीच खूप आनंदी आणि अभिमानी आहे. त्यांना सुरुवातीला वाटणाऱ्या भीतीबद्दल मी दोष देत नाही. कारण मुंबई त्यांच्यासाठी पूर्णपणे नवीन शहर होते. ते कोणालाही ओळखत नसताना मुलीला इथे पाठवणे हा प्रत्येक पालकासाठी एक कठीण निर्णय असतो. त्यांना हेदेखील माहित नव्हते की मला अभिनय खूप आवडतो. त्यांनी विचार केला, की तिला अभ्यास करायचा नाही म्हणून अभिनय करायचा आहे. पण आता त्यांना माझा खूप अभिमान आहे.

### विशाल सरांनी खूप मदत केली...

ओ रोमियो चित्रपटातील तृप्ती डिमरी ही व्यक्तिरेखा खूपच वेगळी आहे. विशाल सर (दिग्दर्शक विशाल भारद्वाज) यांनी मला हे पात्र समजून घेण्यात खूप मदत केली. प्रत्येक चित्रपट, प्रत्येक पात्र हा एक प्रवास आहे जिथे तुम्हाला त्यांना समजून घेण्यासाठी वेळ काढावा लागतो. किमान माझी प्रक्रिया म्हणजे पात्र कसे विचार करते आणि ते वेगवेगळ्या लोकांशी कसे संवाद साधतात हे समजून घेणे. त्यासाठी मी अतुल मोंगिया सरांसोबत अनेक कार्यशाळा घेतल्या. मी माझ्या व्यक्तिरेखेची आव्हाने आणि परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला. मी त्यांच्याकडून खूप काही शिकले. जर मी ते केले नसते तर मी पहिल्या दिवशी खूप घाबरलो असते. शिवाय विशाल सरांसोबत काम करणे ही स्वतःमध्ये एक अभिनय कार्यशाळा आहे. ते अनेकदा तुम्हाला खोल समुद्रात सोडून जातात. तुम्हाला वाटेल की तुम्हाला दृश्याचा स्वर माहित आहे, पण नंतर तुम्हाला कळेल, नाही, हे काहीतरी वेगळे आहे.

# सनी देओल यांनी केली आगामी चित्रपटांची घोषणा

अभिनेता सनी देओल सध्या 'बॉर्डर २'मुळे चर्चेत आहेत. प्रेक्षकांचा या चित्रपटाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. आता सनी देओल यांनी आगामी चित्रपटांची घोषणा केली आहे. ते म्हणाले, की सध्या माझ्याकडे दोन चित्रपट आहेत. एक लाहौर १९४७ आणि दुसरा गबरू. गबरू हा चित्रपट खूप छान आहे, माझ्या खूप जवळचा आहे. तो चित्रपट कदाचित फार चालेल की नाही माहीत नाही, पण मला चित्रपट खूप आवडला आहे. हा चित्रपट १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे, असे ते म्हणाले.

'गबरू' चित्रपटातील भूमिकेबद्दल सनी देओल म्हणाले, की छोट्या शहरात राहणारे बरेच लोक मोठ्या शहरात जाऊन काहीतरी बनण्याचं स्वप्न पाहतात, ही गोष्ट तशीच आहे. मग शहरात तो कसा अडकतो, काय करायला आलो होतो आणि काय करतोय असं त्याला वाटतं, त्यामुळे तो गावीसुद्धा जाऊ शकत नसतो, अशी माहिती त्यांनी दिली. सनी देओल यांच्याकडे 'इक्का', 'रामायण पार्ट १' आणि 'रामायण पार्ट २' हेही चित्रपट आहेत. त्यामुळे येत्या काळात अभिनेता विविध भूमिकेतून पाहायला मिळणार आहे. 'रामायण'मध्ये ते हनुमाच्या भूमिकेतून झळकणार आहे.



# अस्थिरताच खरी स्थिरता आणते!

## कपिलने सांगितल्या कटू काळातील आठवणी

अभिनय क्षेत्रात असे अनेक कलाकार आहेत. ज्यांनी कधीच अभिनय करण्याचा विचार केला नव्हता; पण कालांतराने ते या क्षेत्रात आले. त्यापैकीच एक नाव म्हणजे कपिल शर्मा. कपिल शर्माने त्याच्या संघर्षकाळाबद्दलची माहिती दिली आहे. कपिलने त्याच्या विनोदी शैलीने प्रेक्षकांचं आतापर्यंत खूप मनोरंजन केलं आहे. पण, तुम्हाला माहीत आहे का की, त्याला अभिनेता नाही, तर गायक व्हायचं होतं आणि एवढंच काय तर त्यानं अभिनेता झाल्यानंतरही विनोदी भूमिका करण्याबद्दल काहीच नियोजन नव्हतं; पण ओघाओघानं सगळं घडत गेलं. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्यानं तो नैराश्यात गेला होता. त्याबद्दलची माहिती दिली आहे. कपिल म्हणाला, की ३६ व्या वर्षी मी नैराश्यात गेलो होतो, मी खूप खचलो होतो. लोकांनी तू संपलास, असं म्हणायला सुरू केलेलं. त्यानंतर माझं लग्न झालं. मग पुन्हा माझा शो सुरू झाला आणि मी ३०० हून अधिक एपिसोड केले. पुढे त्यानं अस्थिरताच खरी स्थिरता आहे. कारण त्यामुळे माणूस आलेलं काम निर्मळ भावनेनं करत असतो, असं म्हटलं आहे. कपिलच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर तो अलीकडेच आलेल्या त्याच्या 'किस किसको प्यार करू २'मधून झळकला. हा चित्रपट २०१५ साली आलेल्या



त्याच्या किस किसको प्यार करू या चित्रपटाचा सीक्वेल आहे. परंतु, या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळाला नाही. नुकताच नेटफ्लिक्सवर कपिलच्या 'द ग्रेट इंडियन कपिल शो'चा चौथा सीझन सुरू झाला आहे.

# 'दृश्यम 3'मधून अक्षय खन्नाची एक्झिट

**'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आलेला अभिनेता म्हणजे अक्षय खन्ना. 'धुरंधर'मधील त्याच्या डान्स अणि अभिनयाचं सर्वत्र कौतुक होत असतानाच त्यानं 'दृश्यम ३'मधून एक्झिट घेतली. शूट सुरू होण्याच्या काही दिवस आधीच त्याने हा चित्रपट सोडला. त्यानंतर आता या चित्रपटात एका दाक्षिणात्य अभिनेत्याने एन्ट्री घेतली आहे.**



'दृश्यम' फ्रँचायजीमधला तिसरा भाग 'दृश्यम ३' २०२६ मधील बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अभिषेक पाठक करीत आहेत. त्यामध्ये पुन्हा एकदा अजय देवगण, श्रिया सरन व तब्बू हे कलाकार दिसणार आहेत. या कलाकारांसह अक्षय खन्नादेखील या चित्रपटाचा भाग असणार होता; परंतु काही दिवसांपूर्वीच अशी बातमी आली की, अक्षयने शुटिंग सुरू होण्यापूर्वीच चित्रपट सोडला आहे. अक्षय खन्ना 'दृश्यम ३'मधून बाहेर पडल्यावर या चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेते प्रकाश राज यांची एन्ट्री झाली आहे. अभिनेता प्रकाश राज यांनी स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली आहे की, त्यांनी चित्रपटाची शूटिंग सुरू झालं असल्याचं सांगत मी कुणाला रिप्लेस केलं नाहीय, असंही म्हटलंय. पोस्टमध्ये ते म्हणतात, की दृश्यम ३ चं शूटिंग सुरू केलं आहे. सिनेमाची टीम अगदी उत्तम आहे. त्याशिवाय यात माझी भूमिकाही खास आहे. मला खात्री आहे की, तुम्हाला सिनेमा आणि माझी भूमिका आवडेल. जयदीप अहलावतही या सिनेमात असणार आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी रिलीज होईल.

### वडील सुपरस्टार, पण मुलांना साधी ओळखही नाही...

**आज आम्ही तुम्हाला ३ बॉलीवूड स्टार्सच्या मुलांबद्दल सांगणार आहोत, ज्यांना आपल्या वडिलांइतकं यश मिळू शकलं नाही. कालांतराने हे स्टार्स फिल्म इंडस्ट्रीपासून दुरावले, तर काहींनी अभिनय सोडून इतर पर्याय निवडले.**

» अमजद खान यांचा मुलगा शादाब खानने १९९७ मध्ये 'राजा की आएगी बारात' या चित्रपटातून पदार्पण केलं होतं. पण वडिलांइतकं चांगलं काम करू शकला नाही.

» देव आनंद यांनी त्यांचा मुलगा सुनीलला घेऊन 'आनंद ही आनंद' नावाचा चित्रपट बनवला होता. पण हा चित्रपट फ्लॉप झाला. नंतर सुनील आनंदने फारसे चित्रपट केले नाही.

» राज कपूर यांनी त्यांचा धाकटा मुलगा राजीव कपूर यांनाही अभिनयात संधी दिली होती. त्यांना वडील किंवा भावांइतकं यश मिळू शकलं नाही. राजीव कपूर यांचं २०२१ मध्ये निधन झालं.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# शहरातील विविध भागांना भेटी देऊन महापौरांनी घेतला शहर स्वच्छतेचा आढावा



**नांदेड (प्रतिनिधी)** – नवनिर्वाचित महापौर कविता संतोष मुळे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला आहे. शहर साखर झोपेत असताना सकाळी-सकाळी त्यांनी आज शहराच्या विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन स्वच्छता मोहिमेचा सविस्तर आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना कडक शब्दात निर्देश दिले.

महापौरांनी शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ आणि अंतर्गत गल्ल्यांमधील स्वच्छतेची पाहणी केली. महापौरांनी प्रामुख्याने राज कॉर्नर, चैतन्य नगर एअरपोर्ट रोड, नमस्कार चौक, रेल्वे स्टेशन परिसर, बस स्टँड परिसर या भागात स्वच्छतेच्या कामाची पाहणी करून सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना स्वच्छतेच्या कामासंदर्भात आवश्यक त्या सूचना केल्या. त्यांनी एअरपोर्ट रोडवरील उद्यानात मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांच्या समस्या सुद्धा जाणून घेतल्या. त्याचप्रमाणे कचरा संकलन करणाऱ्या 'घंटागाडी'च्या वेळेबाबत आणि नियमिततेबाबत नागरिकांशी संवाद साधला.

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी केवळ प्रशासन नव्हे, तर नागरिकांनीही कचरा रस्त्यावर न टाकता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौरांनी केले आहे. याप्रसंगी महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, स्वच्छता विभागाचे सहाय्यक आयुक्त गुलाम सादिक, स्वच्छता अधिकारी बालाजी देसाई, स्वच्छता निरीक्षक किशन तारू, प्रियंका एंगडे आणि संबंधित कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते. स्वच्छतेच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे संकेतही महापौरांनी यावेळी दिले आहेत.

### इंदौरच्या धर्तीवर नांदेडमध्ये स्वच्छतेचा प्रयोग

यावेळी बोलताना महापौर सौ. मुळे म्हणाल्या की, इंदौरच्या धर्तीवर नांदेड शहरात स्वच्छतेचा उपक्रम राबविणार असून, स्वच्छ, सुंदर शहर व्हावे, तसेच शिक्षण, आरोग्य, शुद्ध पाणीपुरवठा या बाबींना प्राधान्य देणार आहोत. कचरा डेपोवरील प्रक्रिया आणि सांडपाणी व्यवस्थापनात सुधारणा करण्याचे आदेशसुध्दा महापौरांनी प्रशासकीय यंत्रणेला दिले आहेत. स्वच्छ व सुंदर नांदेड, स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित नांदेड हे आपले मुख्य ध्येय असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड केली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

# न्यायालयाच्या आदेशाने जिल्हा परिषद शाळेची जागा मूळ मालकाला परत

**हदगाव (प्रतिनिधी)** – हदगाव तालुक्यातील बनचिंचोली येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत असलेली सहा गुंठे जमीन देवराव पौळ यांच्या मालकीची असल्याचे न्यायालयात सिद्ध झाले. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने या शाळेची इमारत खाली करून जागेचा ताबा काल न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत देवराव पौळ यांना देण्यात आला. त्यामुळे आता खोल्याविना शाळेतील विद्यार्थी कुठे शिकतील? हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

बनचिंचोली येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत एक ते सात वर्ग चालत असून १२८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शेत गट नंबर २९/बी/१ या शेतामधील ६५३४ चौरस फूट क्षेत्रफळावर जिल्हा परिषदने शाळेचे बांधकाम केले आहे. इथे पाच वर्ग चालवले जातात. तर बाजूलाच असलेल्या दोन वर्गखोल्यांमध्ये दोन वर्ग चालवले जातात. सुमारे १९६० साली किंवा त्यानंतर येथे जिल्हा परिषदच्या शाळेची स्थापना झाली आहे असे सांगण्यात येते. सदर शाळा ही शेत गट नंबर २९/बी/१ या देवराव नारायणराव पौळ यांच्या मालकीच्या शेत सर्वे नंबरमध्ये आहे. या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी कोणतीही भूसंपादन प्रक्रिया केली नाही किंवा दानपत्र घेतले नाही. गावाच्या जवळ असलेल्या



रिकाम्या शेतात शाळा बांधकाम करण्यात आले. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी शेतमालक देवराव पौळ यांनी जिल्हा परिषदकडे व शाळा प्रशासनाकडे स्वामित्व दर्शविणारा पुरावा मागितला होता. परंतु त्यांच्याकडे कोणताही पुरावा नसल्याचे सांगितले.

इसवी सन २०१४ मध्ये पौळ यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात जिल्हा परिषदेने आपल्या जागेवर अवैध ताबा करून बांधकाम केल्यामुळे आपणास ती जागा परत मिळावी म्हणून दावा दाखल केला होता. इसवी सन २०१७ मध्ये जिल्हा आणि सत्र न्यायालयाने न्याय निवाडा होऊन निकाल शेतमालकाच्या बाजूने दिला. त्यानंतर जिल्हा परिषदने कोणताही दावा अपील दाखल केले नाही. त्यानंतर देवराव पौळ यांनी ताबा मिळावा म्हणून न्यायालयात दाद मागितली. याबाबत न्यायालयाने २०१९ ला ताबा देण्याचा आदेश काढला होता. या निकालानंतर मात्र प्रतिवादी असलेल्या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी आक्षेप घेऊन विवाद दाखल केला होता. याप्रकरणी अखेर न्यायालयाने नुकतेच निर्णय देऊन शेतमालकाला ताबा देण्याबाबत आदेश काढला होता. या निवाड्यानुसार बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी रोजी न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत इमारत व परिसर रिकामा करून शेतमालक देवराव पौळ यांना ताबा दिला.

> या इमारतीमध्ये पाच वर्ग चालवले जात होते. तसेच बाजूला अंगणवाडीची सुद्धा इमारत आणि किचन शेड आहे. काल न्यायालयीन कर्मचारी बेलीफ यांनी स्वतः उपस्थित होऊन न्यायालयाचा आदेश दाखवून मुख्याध्यापकांना इमारत खाली करून देण्याबाबत सांगितल्यानंतर मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांनी न्यायालयाचा मान राखून कालच आपले हजेरी पट वगैरे दस्ताऐवज आणि शालेय साहित्य बाजूच्या वर्ग खोल्यांमध्ये स्थलांतरित करून शेत गट नंबर २९/बी/१ मधील इमारत रिकामी करून दिली. त्यानंतर शेतमालक देवराव पौळ यांनी सदर जागेचा ताबा घेऊन कुलूप लावले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे 'आधुनिक पत्रकारिता'वर कार्यशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंपर्क कार्यालय व माध्यमशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक पत्रकारिता या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठस्तरावर होणारी ही कार्यशाळा बुधवार, दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती कार्यशाळेचे समन्वयक व जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी दिली.

या कार्यशाळेचे उद्घाटन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात होणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार असून, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संकल्पनेतून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, विद्यापीठ व माध्यम क्षेत्रासाठी ती उपयुक्त ठरणार आहे. कार्यशाळेसाठी पत्रकारिता क्षेत्रातील नामवंत व अनुभवी मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामध्ये लोकशाही, मुंबईचे मॅनेजिंग एडिटर विशाल पाटील इलेक्ट्रॉनिक माध्यमे व कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दै. सकाळ, पुणे येथील ज्येष्ठ संपादक व विचारवंत श्रीराम पवार पत्रकारितेतील बदलते प्रवाह या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर येथील संपादक नंदकुमार पाटील आधुनिक पत्रकारिता या विषयावर विचार मांडतील. तसेच न्यूज १८ मराठी मुंबई येथील सहसंपादक फराह खान कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारितेचे भविष्य या विषयावर मार्गदर्शन करतील. मॅक्स वुमन चॅनेलच्या संचालिका प्रियदर्शनी हिंगे डिजिटल पत्रकारिता : अर्थ आणि महिला, तर दै. सकाळ, छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय संपादक संतोष शालिग्राम आधुनिक पत्रकारिता आणि तंत्रज्ञानाचे वरदान या विषयावर व्याख्यान देतील. विद्यापीठाच्या आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी नॅरेटिव्ह इंजिनिअर्स : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माध्यमे विद्यापीठांची प्रतिमा कशी घडवतात या विषयावर विचार मांडतील.

या सर्व मान्यवरांना आपल्या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव व अभ्यास असून त्यांच्या व्याख्यानांमुळे पत्रकार बांधवांना आधुनिक पत्रकारितेतील संधी, आव्हाने व भविष्यातील दिशा यांचे सखोल आकलन होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी नवोपक्रम, नवसंशोधन व सहाचार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम तसेच माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ सुहास पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या गठित करण्यात आल्या असून विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रयत्नशील आहेत. विद्यापीठ परीक्षेत्रातील पत्रकार बांधवांसाठी आयोजित या कार्यशाळेत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक यांनी केले आहे.

# श्री परमेश्वर मंदिरात महाशिवरात्री यात्रा महोत्सवाला अभिषेक महापूजेने भक्तिमय वातावरणात प्रारंभ

**हिमायतनगर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील वाढोणा येथील श्री परमेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सव २०२६ चा शुभारंभ शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी एकादशीच्या मुहूर्तावर भक्तिमय वातावरणात झाला.

यात्रा महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मंदिराचे सेक्रेटरी अनंता देवकते यांच्या हस्ते सहकुटुंब भगवान श्री परमेश्वर देवाचा अभिषेक महापूजा संपन्न झाली. त्यानंतर अखंड हरीनाम, वीणा पारायण सोहळ्याची सुरुवात आरती पूजा करून झाली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. वैदिक मंत्रोच्चार, हरहर महादेवच्या जयघोषात भगवान शंकराच्या पिंडीवर



अभिषेक, दुग्ध व जलाभिषेक करण्यात आला. या वेळी देवकते कुटुंबासह मान्यवर, विश्वस्त, सेवेकरी व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलवार बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा पोलीस प्रशासनाच्यावतीने स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी तलवार बाळगणाऱ्यांविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी भाग्यनगर व मनाठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी हदगाव तालुक्यातील मनाठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अल्पवयीन बालकाकडे तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शिबदरा पाटी ते शिबदरा गावात जाणाऱ्या रस्त्यावर बालकाकडील तलवार (किंमत ५००) ताब्यात घेतली. या प्रकरणी रेणुप्रसाद भोपाळकर यांच्या फिर्यादीवरून मनाठा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेत भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या दीपनगर येथे एका तरुणाकडे तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथे जाऊन अक्षय संजय लोणे या २३ वर्षीय तरुणाकडील तलवार ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला.

# सौ. निलावती वंजे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– विवेकनगर येथील रहिवाशी सौ. निलावती शाहूराज वंजे (वय ८५ वर्षे) यांचे दिनांक १४ रोजी वृद्धापकाळमुळे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, ४ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



त्यांची अंत्ययात्रा रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता विवेकनगर येथील निवासस्थानापासून निघून गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नांदेड जिल्हा मुद्रक संघाचे सक्रिय सदस्य रमेश वंजे यांच्या त्या मातोश्री होत.

# पुलवामाच्या शूरवीरांना नांदेडची सलामी

### माजी मंत्री डी. पी. सावंत यांचे बाईक रॅलीतून अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)** –पुलवामा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या ४० सीआरपीएफ जवानांना नांदेडमध्ये अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या हल्ल्याला सहा वर्षे पूर्ण होत असताना माजी मंत्री डी. पी. सावंत यांच्या उपस्थितीत पॅरामिलिटरी संघटनेतर्फे भव्य बाईक रॅली काढण्यात आली.

शहरातील तिरंगा चौक येथील शहीद स्मारकापासून शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.१५ वाजता रॅलीला सुरुवात झाली. शहरातील विविध मार्गांनी मार्गक्रमण करत ही रॅली आय. टी. आय. परिसरातील महात्मा फुले स्मारकापर्यंत पोहोचली. हातात तिरंगा, अंगावर देशभक्तीची भावना आणि घोषणांनी दुमदुमलेले वातावरण यामुळे परिसरात राष्ट्रप्रेमाची लाट उसळली होती.



या रॅलीत माजी मंत्री डी. पी. सावंत यांच्यासह पॅरामिलिटरी संघटनेचे अध्यक्ष सुनील लोणे, उपाध्यक्ष जनार्धन शेजुळे, पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ सर्वांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना डी. पी. सावंत यांनी, देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या शूर सैनिकांचे बलिदान कधीही विसरले जाणार नाही. त्यांच्या त्यागामुळेच आपण सुरक्षित आहोत, असे सांगत उपस्थितांना देशभक्तीची प्रेरणा दिली. कार्यक्रमादरम्यान शहीदांच्या स्मरणार्थ दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. नांदेडकरांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत शहीद जवानांना कृतज्ञतेची सलामी दिली. पुलवामाच्या शूरवीरांच्या स्मृती आजही प्रत्येक भारतीयांच्या हृदयात जिवंत असल्याचे या रॅलीतून अधोरेखित झाले.

# मी काँग्रेसचा सच्चा कार्यकर्ता; भविष्यात भाजप बॅकफुटला गेली तर अनेक नेते पुन्हा काँग्रेसमध्ये येतील

### -खासदार रवींद्र चव्हाण यांचा दावा



**नांदेड (प्रतिनिधी)**– ऐन जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोशल माध्यमातून मी भाजपात प्रवेश करणार अशा वावड्या ज्या कोणी उठवल्या त्यांना माझा सवाल आहे की, ग्रामीण भागात काँग्रेस मजबूत आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये काँग्रेस आपले अस्तित्त्व दाखवून देईल. मी काँग्रेस आणि राहुल गांधींचा सच्चा कार्यकर्ता असून, कदापी काँग्रेस सोडणार नाही. मात्र येणाऱ्या काळात भाजप बॅकफुटला गेली तर भाजपात गेलेले पुन्हा काँग्रेसमध्ये येतील, असा दावा नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शहर आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एकंदरीत भाजप सरकारच्या विरोधात धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या संपर्क कार्यालयात शनिवारी बोलावण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खासदार रवींद्र चव्हाण बोलत होते. यावेळी नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, प्रदेश कार्यकारिणीचे सुरेंद्र घोडजकर, जिल्हा कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, बालाजी चव्हाण, पप्पू कोंडेकर, नगरसेवक सत्यपाल सावंत यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

देशाच्या सर्वोच्च असलेल्या संसदेमध्ये पंतप्रधान पदाच्या समांतर असलेले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न देणे म्हणजे संविधानाचा गळा घोटणे होय. केंद्र सरकारने अर्थसंकल्पीय बजेट देशासमोर ठेवले ते कुठेही सर्वसमावेशक नाही. त्यात मराठवाडा आणि महाराष्ट्राला फक्त दोन बुलेट ट्रेन दिल्याने राज्याचा विकास होणार नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. ईप्स्टीन फाईल बाबत जे सरकारने अमेरिकेसोबत करार केले ते देशातील शेतकऱ्यांना मारक असल्याचे खासदार चव्हाण यांनी सांगितले. अमेरिकेतून येणाऱ्या मालावर कुठलाही कर नाही, परंतु भारतातून अमेरिकेत पाठविणाऱ्या मालावर मात्र मोठा कर लादल्याने देशातील शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचे काम मोदी सरकार करत असल्याचा आरोप खा. चव्हाण यांनी केला. स्वतःला हिंदू म्हणून घेणारे भाजप सरकार संत, महात्मे यांना मारहाण करत आहेत. अहिल्यादेवी होळकरांचे ऐतिहासिक स्मारक असलेले जमीनदोस्त केले. सरकार अतिशय जातीयवादी असल्याचे आपल्या कृतीतून दाखवत आहे.

जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर असल्याने आणि नांदेड जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याने माझी सोशल माध्यमावर नाहक मी काँग्रेस सोडून भाजपात जाणार अशी बदनामी सुरू केली आहे. परंतु मी राहुल गांधी आणि काँग्रेसचा सच्चा पाईक असून, काँग्रेस सोडून कुठेही जाणार नाही. त्या उलट भविष्यात भाजप बॅकफुटला गेली तर भाजपामध्ये गेलेले अनेक नेते ज्यात खासदार अशोकराव चव्हाण यांचे नाव घेत काँग्रेसमध्ये येतील असा दावाही खासदार चव्हाण यांनी केला आहे. सोमवारी होणाऱ्या धरणे आंदोलनात जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक आणि काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार आणि डॉ. यशपाल भिंगे यांनीही पत्रकारांशी संवाद साधला. यानंतर पुलवामा हल्ल्यासंदर्भात शहिदांना खासदार चव्हाणांसह उपस्थित सर्वांनी अभिवादन केले.

# सूर्यकांत सातारे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – 



स्वामी विवेकानंद नगर येथील नागरिक सूर्यकांत मन्थयप्पा सातारे (वय ६३) यांचे दीर्घ आजारामुळे दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर त्यांचे मूळ गाव भोकसखेडा (ता. देगलूर) येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, २ भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. शिवसेनेचे उपशहरप्रमुख सुनील सातारे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# एटीएम फोडून लाखो रुपयांची रोकड पळवणारे हरियाणातील दोन अट्टल चोर जेरबंद

**नरसीफाटा (वार्ताहर)** – बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम फोडून चार लाख रुपयांची रोकड लंपास झाली होती. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या या घटनेतील फरार आरोपींना रामतीर्थ पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हे दोन्ही एटीएम चोर हरियाना राज्यातील असून, रामतीर्थ पोलिसांनी या आरोपींना छत्रपती संभाजीनगर शहरातून अटक केली आहे.

या प्रकरणाची माहिती देताना सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०२५ मध्ये रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या शंकरनगर येथील एसबीआयच्या एटीएम केंद्रावर अज्ञात चोरट्यांनी एटीएम मशीन फोडून त्यातील रोकड लंपास केली होती. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या गंभीर गुन्ह्याचा तपास रामतीर्थ पोलिसांनी अत्यंत बारकाईने सुरू ठेवला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण,



गोपनीय माहिती आणि स्थानिक सूत्रांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. तपासाची साखळी थेट छत्रपती संभाजीनगरपर्यंत पोहोचली आणि अखेर पोलिसांनी सापळा रचून दोन आरोपींना जेरबंद केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मोहम्मद कैफ नजमुद्दीन (वय २१, रा. उलेता ता. फिरोजपूर जि. नुहू, हरियाणा) आणि आझाद इसरू खान (वय २४, रा. झारोकारी ता. पुन्हाना जि. नुहू, हरियाणा) अशी आहेत. दोघांनाही दि. १३ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध गुन्हा र. नं. ३१३/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी (पीसीआर) मंजूर केली आहे.

या संपूर्ण कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार शिवराज नरवाडे, बीट जमादार चंद्रमुनी सोनकांबळे तसेच ईजळकुंटे यांनी महत्त्वाची व कौतुकास्पद भूमिका बजावली. त्यांच्या चिकाटी, समन्वय आणि वेगवान हालचालीमुळे हा गुन्हा उघडकीस येऊन आरोपी गजाआड झाले. रामतीर्थ पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, गुन्हेगार कितीही तरबेज असला तरी कायद्याच्या हातातून सुटू शकत नाही, हा संदेश पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाला आहे.

# सुगंधाबाई शिंदे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – 



नांदेड तालुक्यातील डेरला गावातील ज्येष्ठ महिला नागरीक कै. सुगंधाबाई मुंजाजी पाटील शिंदे वय ९८ वर्षे यांचे शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून, त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता डेरला ता. लोहा, जि. नांदेड येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे असा परिवार असून, बळीराम मुंजाजी शिंदे यांच्या त्या आई होत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com